नियमित दिवाणी दावा क्र.५६/२०२१
विठोबा मालुंजकर वि. उत्तम गुळवे व इतर
CNR No.- MHNS230013332021

आदेश निशाणी क्र.०५

वादी/अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रतिवादी/गैरअर्जदार यांच्याविरुध्द तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश होण्याकरीता केलेला आहे.

०२ वादी/अर्जदार यांचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, मौजे भरवीर बु. शिवारातील शेतजमीन मिळकत गट क्र.३८१ क्षेत्र ४ हे. २ आर., पोटखराब ० हे. ८ आर. असे एकुण ४ हे. १० आर. ही शेतजमीन मुळत: प्रतिवादी यांची असून त्यांनी वादीला २ हे. म्हणजेच ५ एकर क्षेत्र दिनांक ०१/०२/१९८२ रोजी फरोक्त खरेदीखताने विक्री केलेले आहे. गट क्र.३८१ चा जुना गट क्र.३६८ च्या एकुण क्षेत्रापैकी २ हे. पश्चिम दिशेकडील क्षेत्राचा कब्जा वादीला दिला आहे. गट क्र.३८२ हे गट प्रतिवादी क्र.०१ यांच्या मालकीचे आहे. सन १९८२ साली दावा मिळकत गट क्र.३८१ क्षेत्र २ हे. जमिनीचा कब्जा वादीला दिलेला आहे तेव्हापासून वादी सदर शेतजमिनीच्या कब्जेवहीवाटीत असून त्याचा उपभोग घेत आहे. सदर जमिनीचा कब्जा मिळाल्यानंतर वादीने त्याची मशागत केली व सपाटीकरण करुन त्यात विहीरदेखील खोदलेली आहे. वादीस सदर कामासाठी अंदाजे पाच ते सात लाख रुपये खर्च लागलेला आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये घर देखील बांधले आहे. दावा मिळकतीच्या सातबारा उता-याला घराची नोंद आहे. तसेच इलेक्टीक वीज कनेक्शन घेतलेले आहे. गट क्र.३८१ मधील वादीचे २ हे. क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ यांच्या मालकिची आहे. त्यामधून ० हे ५ आर क्षेत्र प्रतिवादी क्र १ ने प्रतिवादी क्र.०६ यांना विकलेले आहे. दावा मिळकत गट क्र.३८१ मधील वादीचे २ हे. क्षेत्र अंदाजे ३० ते ४० वर्षापासून वादीच्या कब्जात असून त्यांनी गट क्र.३८२ च्या

बांधाचे कधीही अतिक्रमण केलेले नाही किंवा त्यांनी अतिक्रमण केले अशी प्रतिवादी क्र.०१ यांनी तक्रार केलेली नाही. प्रतिवादी क्र.०१ ने त्याची मिळकत गट क्र.३८२ ची मोजणी करण्यासाठी अर्ज दिल्याने दिनांक १८/०१/२०१७ रोजी त्यांची मोजणी करण्यात आली व त्यात वादीचा मिळकतीमध्ये ० हे. ३३ आर क्षेत्र मोजणी नकाशानुसार अतिक्रमण झालेले आहे असे अभिप्राय मोजणी अधिकारी यांनी दिलेला आहे. मोजणी करतेवेळी मोजणी अधिकारी यांनी वादीला कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही. हद्दी निश्चित करुन मोजणी करणे आवश्यक होते परंतु मोजणी कामी वादीच्या देखत हद्दी निश्चित न करता प्रतिवादी क्र.०१ यांनी मोजणी करुन घेतली आहे. प्रतिवादी यांनी गट क्र.३८१ मधील उर्वरित क्षेत्राची कधीही मोजणी केलेली नाही. त्यामुळे कायदेशिर तरतुदींचे पालन न करता प्रतिवादींनी मोजणी केलेली आहे त्यामुळे सदरची मोजणी बेकायदशिर व चुकीची आहे. प्रतिवादी क्र.०१ यांनी दिनांक १८/०१/२०१७ रोजी मोजणी नकाशावरुन ३३ आर अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेकामी उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्रंबकेश्वर यांचा मोजणी नकाशाच्या आध ारे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेकामी केस क्र.५९/२०१७ अन्वये दाखल केली. सदर केसचा निकाल दिनांक २८/०३/२०१८ रोजी लागलेला असून ३३ आर क्षेत्राचा ताबा वादीने मोजणी नकाशानुसार प्रतिवादी क्र.०१ यांना देण्याचा आदेश पारीत करण्यात आला. सदर निर्णयाविरुध्द वादीने अप्पर जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे अपिल दाखल केले असता त्यांनी उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्रंबकेश्वर यांनी दिलेला निर्णय कायम ठेवलेला आहे. सदर प्रकरण प्रलंबित असतांना वादीने मोजणीची मागणी केली तेव्हा मोजणी करण्याचा आदेश होणे आवश्यक होते. परंतु मोजणी होईपर्यंत न थांबता उपविभागीय अधिकारी यांनी घाईघाईने निर्णय दिला तसेच अप्पर जिल्हाधिकारी यांनी सुध्दा निर्णय दिला असता तर वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र निश्चित झाले असते. वास्तविक गट क्र.३८१ या मिळकतीचा पोट हिस्सा झालेला नाही, त्याचे मालक वेगवेगळी आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ च्या

अतिक्रमण अर्ज व मोजणी नकाशाची कार्यवाही प्रथमपासुनच बेकायदेशिर होते. महसूल अधिकारी यांनी प्रतिवादी क्र.०१ च्या लाभात न्यायनिर्णय दिलेला आहे. त्यामुळे त्या न्यायनिर्णयाच्या आधारे प्रतिवादी क्र.०१ हे दावा मिळकतीचे ३३ आर क्षेत्राचा कब्जा घेतील व त्यामुळे वादी यांच्या शांततामय कब्जास अडथळा निर्माण होईल त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ ने वादीच्या कब्जास अडथळा करु नये याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दावा निकाली लागण्यासाठी बराच अवधी लागणार आहे त्यामुळे प्रतिवादी वादीच्या कब्जास अडथळा केल्यास वादीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ ने वादीच्या कब्जास कोणताही अडथळा करु नये असा तात्पुरता कायम मनाई हुकूम वादीच्या लाभात पारीत करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३ प्रतिवादी क्र.०१ यांनी त्यांच्या लेखी कैफियत व तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जास उत्तर निशाणी क्र.१७ अन्वये दाखल केली आहे. त्यांनी वादीच्या वादपत्रातील व अर्जातील कथनांचे खंडण केले आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, प्रतिवादी यांना वादी यांनी गट क्र.३८१ मधील २ हे. क्षेत्र मोघम स्वरुपात खरेदी दिले त्यावेळेस दाखवून दिले होते. परंतु त्यानंतर वादी यांनी बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन खरेदी केलेल्या क्षेत्रापैकी जास्त क्षेत्र स्वत:च्या कब्जात आजपर्यंत बळकावले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी रितसरपणे मोजणी करुन अतिक्रमण असलेल्या क्षेत्राचा कब्जा मिळणेकामी अर्ज केला व त्याचप्रमाणे प्रतिवादीच्या लाभात आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी यांनी वादातील गट क्र.३८१ ची मोजणी केली असता त्यात वादीचे खरेदी केलेले क्षेत्रानुसार वादीचे क्षेत्र मोजून मापून दाखवून दिलेले आहे. परंतु वादीने अनाधिकाराने अधिकचे क्षेत्र ताब्यात ठेवलेले आहे. सदरील क्षेत्र काढून घेणेबाबत प्रतिवादी यांनी मोजणीच्या वेळेस वादी यांना विनंती केली असता त्यांनी नकार दिल्यामुळे नाईलाजास्तव प्रतिवादी यांना वादीविरुध्द महसूल न्यायाधिकरणाकडे दाद मागावी लागली. सदरची

मोजणी सन २०१७ मध्ये झाली तेव्हा दावा दाखल करणे गरजेचे होते. दावा मुदतीत नसल्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे प्रतिवादी क्र.०१ ने गट क्र.३८२ च्या मोजणीकामी अर्ज दिल्यानंतर संबंधितांना नोटीस काढण्यात आली. त्यानंतर भुमी अभिलेख यांच्यामार्फत प्रत्यक्ष जागेवर मोजणी होउन हद्दी कायम करण्यात आल्या. सदर मोजणीस कोणीही कोणतीही हरकत उपस्थित केलेली नाही. सदर मोजणीत वादी यांनी ०.३३ हे.आर क्षेत्रात अतिक्रमण केल्याची बाब नमूद करण्यात आली. प्रतिवादीने त्यांना अतिक्रमण काढून घेण्याची विनंती केली. परंतु त्यांनी टाळाटाळ केल्यामुळे प्रतिवादीला उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल करावा लागला. उपविभागीय अधिकारी यांनी दोनही पक्षांचे म्हणणे ऐकूण गुणवत्तेवर अर्ज मान्य केला. त्यानंतर वादीने सदर निर्णयाविरुध्द अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल दाखल केले. त्यात सुध्दा प्रतिवादी क्र.०१ यांना गट क्र.३८२ मध्ये ०.३३ हे. आर. इतके अतिक्रमण वादीने केल्याचे सिध्द करत आहे असे अप्पर जिल्हाधिकारी यांनी निष्कर्ष देउन अपिल फेटाळले आहे. परंतु आदेशाविरुध्द वादीने अप्पर आयुक्त नाशिक यांच्याकडे रिव्हीजन केले असता त्यात प्रतिवादी क्र.०१ च्या बाजुने आदेश पारीत करण्यात आला. वादीला दावा दाखल करण्यासाठी कोणतेही कारण नाही. केवळ न्यायालयाडून अंमलबजावणीची स्थगिती ठेवून त्यास दावा प्रलंबित ठेवून प्रतिवादी क्र.०१ यांचे महसूल न्यायालयाची आदेशाची अंमलबजावणी लांबणीवर टाकण्यासाठी खोटा प्रयत्न करण्याकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.०१ च्या मिळकतीमध्ये वादी यांनी अतिक्रमण केल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर शासकीय मोजणी केली असून त्यावेळेस जागेवर पंचनामा करण्यात आला व पंचांसमक्ष मोजणी झाल्यानंतर सही केलेली आहे. सदर पंचनाम्यावर वादीची देखील सही आहे. त्या मोजणीबाबत वादीने अद्यापपावेतो कोणत्याही न्यायालयात दाद मागितलेली नाही. सदर मोजणीमध्ये वादी यांनी प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे ही बाब सिध्द झालेली आहे. केवळ प्रतिवादी यांना त्रास

देण्याच्या दृष्टीने वादीने सदरचा दावा दाखल केलेला आहे. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस नाही. तसेच तौलानिक तराजू वादीच्या लाभात नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादी क्र.०१ ने विनंती केली आहे.

०४ प्रतिवादी क्र.०२ ते ०६ यांना दावा समन्स प्राप्त होउनही त्यांनी प्रस्तुत प्रकरणात हजर होउन त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे दावा व अर्ज त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश पारीत करण्यात आला आहे.

०५ वादीतर्फे वकील श्री. डी.के.शिंदे यांनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला. प्रतिवादी क्र.०१ तर्फे वकील श्री.आर.ए.जाधव यांनी कैफियतीतील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला. दोन्ही पक्षाचे कथन, अभिलेखावरील दस्तऐवज तसेच दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यापुढे खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहे.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
०१)	वादीची प्रथमदर्शनी केस आहे हे वादी सिध्द करतो काय?	होय.
०२)	सोयीचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे हे वादी सिध्द करतो काय?	होय.
०३)	तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होते काय?	होय.
०४)	कोणता आदेश?	मंजूर.

कारणमिमांसा

मुददा क्र.०१ ते ०३ करीता :-

०६ वादीने प्रस्तुतचा दावा हा ठरावाकरीता तसेच निरंतर मनाई

हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार/वादी यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी गट क्र. ३८१ मधील २ हे. क्षेत्र प्रतिवादी क्र.०१ व यांनी त्याच्याकडून सन १९८२ साली विकत घेतलेले असून तेव्हा दावा मिळकतीचा कब्जेवहीवाटीत आहेत. त्यांनी प्रतिवादी क्र.०१ यांच्या गट क्र.३८२ मध्ये कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. प्रतिवादी क्र.०१ यांनी तातडीची मोजणी करीता अर्ज केला त्यात त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नाही व त्यांच्या हद्दी कायम न करता गट क्र.३८२ मध्ये त्यांचे ०.३३ हे. आर. अतिक्रमण असल्याचे मोजणीत बेकायदेशिरपणे दर्शविले आहे. सदर आदेशाची अंमलबजावणीकरिता प्रतिवादी क्र.०१ ने महसूल अधिकारीकडे अर्ज केला त्याचप्रमाणे त्यांचे आदेशाविरुध्द वादीने अपिल तसेच रिव्हीजन दाखल केले. परंतु महसूल अधिका-यांनी मोजणीचा आदेश देउन वादी व प्रतिवादी क्र.०१ याचे क्षेत्र निश्चित करुन दिलेले नाही. त्यामुळे त्यांचा आदेश हा बेकायदेशिर आहे व सदर आदेशाच्या आधारे प्रतिवादी क्र.०१ वादीच्या कब्जास अडथळा निर्माण करण्याची व त्यांच्याकडून कब्जा काढून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

०७		याउलट प्रतिवादी क्र.०१ यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी गट क्र.३८२ च्या मोजणीकरीता अर्ज दिला असता तातडीची मोजणी करण्यात आली व त्याबाबत वादीला नोटीस देखील देण्यात आली. सदर मोजणीत प्रतिवादी क्र.०१ यांच्या गट क्र.३८२ मध्ये वादी यांचे तसेच प्रतिवादी क्र.०२ ते ०५ यांचे अतिक्रमण असल्याचे आढळून आले व त्याचप्रमाणे त्यांना महसूल अधिका-यांकडे कब्जा मिळण्याकरीता कार्यवाही केली. मोजणी तसेच महसूल अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश हा कायदेशिर आहे. केवळ अंमलबजावणीकरीता उशिर करण्याकरीता वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

०८		वादीने त्यांच्या कथनांच्या समर्थनार्थ दावा मिळकत क्र.३८१ व ३८२ यांचा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे महसूल अधिकारी यांनी

दिलेला आदेशची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे दावा मिळकतीचा सन १९८२ चे खरेदीखत, फेरफार नोंदी, दावा मिळकतीचा मोजणीचा नकाशा इ. दाखल केलेले आहेत. याउलट प्रतिवादी क्र.०१ ने त्याच्या कथनाच्या समर्थनार्थ मोजणी क्र. ३२७/१७ चा मोजणी नकाशा, उपविभागीय अधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी व अप्पर आयुक्त यांच्या आदेशाची प्रमाणीत सत्यप्रत, मंडळ अधिकारी यांच्यासमक्ष वादी व प्रतिवादी यांनी दिलेला जबाब व पंचनाम्याची सत्यप्रत दाखल केलेली आहे.

०९ सन १९८२ सालचे खरेदीखत, प्रतिवादीने गट क्र.३८२ ची केलेली मोजणी व महसूल अधिकारीसमक्ष झालेली कारवाई व त्यातील निकाल दोनही पक्षांना मान्य असल्याचे दिसून येते. वादीने दाखल केलेला दिनांक ०१/०२/१९८२ रोजीचे खरेदीखताचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.०१ यांचा व त्यांची आई ममताबाई सोमा गुळवे यांनी जुना गट क्र.३६८ नमूद क्षेत्र पैकी २ हे. क्षेत्र वादीला विक्री केले असल्याचे दिसून येते. सदर खरेदीखत जुना गट क्र.३६८ च्या चतु:सिमा नमूद केलेल्या आहेत. त्यात कधीही वादीला विक्री केलेल्या क्षेत्राच्या चतु:सिमा नमूद केलेल्या नाहीत. प्रतिवादी यांच्या कैफियतीचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी गट क्र.३८१ मधील ५ एकर क्षेत्र मोघम स्वरुपात वादीला खरेदी दिले व त्यावेळेस दाखवून दिले होते असे कथन केलेले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे सन १९८२ साली त्यांनी दावा मिळकतीतील २ हे. क्षेत्र खरेदी केले तेव्हापासून ते त्याच्या कब्जेवहीवाटीत आहे व त्यांना शेतीची मशागत देखील केलेली आहे व त्याकरीता त्यांना पाच ते सात लाख रुपये खर्च लागला आहे. सन १९८२ पासून सन २०१७ च्या मोजणीपर्यंत प्रतिवादी क्र.०१ ने वादींना त्यांच्या क्षेत्रात अतिक्रमण केलेबाबत कधीही तक्रार केलेली नाही. दावा मिळकतीचा सातबारा उता-यावर देखील वादीचे नावे २ हे. शेतजमिनीचा कब्जेवहीवाटीत असल्याबाबतची नोंद दिसून येते.

१० मोजणीचा नकाशा दिनांक १८/१/२०१७ च्या नकाशाचे अवलोकन

केले असता त्यात गट क्र.३८२ मधील गट क्र.३८१ चे ०.३३ हे. आर अतिक्रमण असल्याचे निळ्या रंगाने दर्शविले आहे. तसेच गट क्र.३८४ चे गट क्र.३८२ मधिल ०.४६ हे. आर. अतिक्रमण असल्याचे गुलाबी रंगाने दर्शविले असल्याचे दिसून येते. वादी यांच्या कथनाप्रमाणे सदर मोजणीच्या वेळेस त्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती व त्यांच्या हद्दी निश्चित करुन देण्यात आलेल्या नाहीत. दोनही पक्षांनी दाखल केलेल्या मोजणीच्या नकाशात गट क्र.३८२ च्या हद्दी दर्शविलेल्या आहेत व त्यामुळे गट क्र.३८१ व ३८४ यांचे अतिक्रमण दर्शविलेले आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र.०१ यांच्याकडून गट क्र.३८१ वरील २ हे. जमीन खरेदी केली ही बाब दोनही पक्षांना मान्य आहे. प्रतिवादी क्र.०१ यांच्याच कथनाप्रमाणे त्यांनी मोघम स्वरुपात वादीने खरेदी केलेली जमीन दर्शवून त्यांना कब्जा दिलेला आहे. अशा वेळेस प्रतिवादी क्र.०१ यांनी वादींना दिलेल्या क्षेत्रात वादीने त्यांच्या जमिनीचे मशागत केलेली असून त्यासाठी खर्च केला असल्याचे व त्यापासून उत्पन्न घेत असल्याचे दिसून येते.

<u>**११**</u>		मोजणीच्या नकाशात गट क्र.३८२ मध्ये वादी यांचे अतिक्रमण आढळून आल्यामुळे त्याचा कब्जा काढून मिळण्याबाबत प्रतिवादीने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अतिक्रमण अर्ज क्र.५९/२०१७ अन्वये केला असल्याचे दिसून येते. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या न्यायनिर्णयात वादीने सन १९८४ मध्ये २ हे क्षेत्र खरेदी केल्याचे व प्रतिवादी क्र.०१ यांना विक्री केल्याचे क्षेत्राचा कब्जा वादी यांनी मोजणी करुन हद्दीच्या खुणा तसेच निशाण्या दाखवून दिलेल्या असल्याचे नमूद केले असले तरी सन १९८४ मध्ये सदरचे क्षेत्र खरेदी केलेले असून सन २०१७ पर्यंत ३३ वर्षाच्या कालावधी उलटलेला असून त्या कालावधीत अतिक्रमण झाल्याची शक्यता नाकारता येत नाही व मोजणी नकाशात दर्शविल्याप्रमाणे अतिक्रमण झाल्याची बाब स्पष्ट झालेली आहे असे अवलोकन करुन वादीचे म्हणणे फेटाळलेले आहे व प्रतिवादी क्र.०१ चा अर्ज मंजूर करुन वादी तसेच प्रतिवादी क्र.०२ ते

०५ यांना अनुक्रमे ०.३३ व ०.४६ हे आर शेतजमीन वरील कब्जा काढून असा आदेश दिला असल्याचे दिसून येते. सदर आदेशाविरुध्द वादीने अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल क्र.४३३/२०१८ अन्वये केलेले असून त्याचा दिनांक ०४/०३/२०२१ रोजी निकाल लागला असल्याचे दिसून येते व त्यात सुध्दा उपविभागीय अधिकारी यांचा आदेश कायम ठेवण्यात आल्याचे दिसून येते. सदर आदेशाविरुध्द वादीने अप्पर आयुक्त नाशिक यांच्याकडे अपिल क्र.२३०/२०२१ अन्वये केलेले असून त्याचा निकाल दिनांक ०८/०४/२०२२ रोजी पारीत करुन अपिल नामंजूर केले असल्याचे दिसून येते. प्रतिवादीने दाखल केलेला जबाब व पंचनाम्याचे अवलोकन केले असता वादीने त्याची ५ एकर क्षेत्र मोजणीप्रमाणे निघेल ते ठेवून इतर जमिनीचा कब्जा देण्यास तयार आहे व भुमी अभिलेख कार्यालय येथे सरकारी मोजणी अर्ज करुन अती तातडीची मोजणी करावी व त्यास प्रतिवादी क्र.०१ याची पुर्णपणे संमती द्यावी असा वादीने जबाब दिला असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.०२ ते ०५ यांनी अर्ज केलेला असून एकत्रिकरण योजनेत दोष आढळल्यास जी काही कार्यवाही होईल ती मान्य राहील व त्यांना कब्जा स्थगितीची कारवाई मान्य आहे असे दिनांक २५/०८/२०२२ रोजी मंडळ अधिकारी यांना जबाब दिला असल्याचे दिसून येते. तसेच पंचनाम्यात देखील वादी हे तातडीची मोजणी करतील व ती मोजणी वादी व प्रतिवादी यांना मंजूर राहील असे नमूद केले आहे. सहा महिन्यानंतर मार्च २०२३ मध्ये अटी व शर्ती पुर्ण न झाल्यास तहसिलदार, इगतपुरी यांच्या दिनांक ३१/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये गट क्र.३८१ व ३८४ वरील अतिक्रमण जमिनीचा ताबा देण्याबाबतची कारवाई मंडळ अधिकारी यांनी करावी असा पंचांसमक्ष पंचनामा केल्याचे दिसून येते व त्यास वादी व प्रतिवादी क्र.०१, ०३ व ०५ यांनी स्वाक्षरी केले असल्याचे दिसून येते.

१२ प्रतिवादी क्र.०१ यांनी त्यांची शेतजमीन ३८२ ची मोजणी केली असता त्यावर वादी तसेच प्रतिवादी क्र.०२ ते ०५ यांचे अतिक्रमण असल्याचे आढळून आले.

वादी यांनी दावा मिळकत क.३८१ पैकी २ हे. शेतजमीन सन १९८२ साली खरेदी केली. तेव्हापासून बराच कालावधी लोटला असून दरम्यानच्या काळात अतिक्रमण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे जरी असले तरी प्रतिवादी क.०१ यांनी त्यांच्या गट क.३८१ किंवा ३८२ या जमिनीवर वादीने अतिक्रमण केले किंवा त्यांचा बांध फोडून त्यावरील जागा त्यांच्या कब्जात घेतली असे दरम्यानच्या काळात अशी कोणतीही तक्रार केलेली नाही किंवा दावाही केलेला नाही. केवळ दिनांक १८/०१/२०१७ रोजीच्या मोजणीत अतिक्रमण आढळून आल्यामुळे महसूल अधिकारी कडे कब्जा मिळणेबाबत कारवाई केली असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क.०२ ते ०५ यांच्या स्वत:च्या मालकीची शेतजमीन आहे. त्यामुळे त्यांचा प्रतिवादी क.०१ चे क्षेत्र अतिक्रमण आढळून आल्यामुळे त्यांनी अपिल केले नसल्याचे दिसून येते. परंतु वादी यांनी २ हे. शेतजमीन ही प्रतिवादी क.०१ यांच्याकडूनच खरेदी केलेली आहे व प्रतिवादी क.०१ यांनीच वादीचे क्षेत्र दाखवून कब्जा दिलेला आहे. अशा परिस्थितीत वादीला २ हे जमिनीचा कब्जा देतांना चुकून गट क.३८२ वरील काही क्षेत्राचा कब्जा दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादीने त्याच्या कैफियतीत त्यांनी गट क.३८१ ची मोजणी केली असता त्यात वादीचे खरेदी केलेल्या क्षेत्रानुसार वादीचे क्षेत्र मोजून मापून दाखवून दिलेले आहे असे कथन केलेले आहे. परंतु, मोजणीच्या नकाशात गट क.३८१ ची मोजणी करुन वादी, प्रतिवादी क.०१ व प्रतिवादी क.०६ यांच्या मालकीच्या मिळकतीच्या हद्दी, खुणा ठरवून त्यांना दाखविण्यात आल्या व वादी त्याच्या मालकीच्या २ हे. क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राच्या ताब्यात आढळून आले असे दर्शविलेले नाही किंवा तसे प्रतिवादी यांनी कथनही केलेले नाही. वादी यांच्या मालकीची ५ एकर शेतजमीन त्यांना मोजून दिल्यास व प्रतिवादीच्या जमिनीत कोणतेही अतिक्रमण आढळून आल्यास ते अतिक्रमण काढून देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे गट क.३८१ व ३८२ या दोनही शेतजमिनीचे एकत्रित मोजमाप होणे गरजेचे आहे. त्याशिवाय वादी व यांना प्रतिवादी यांचा गट क.

३८२ मध्ये अतिक्रमण केले असे सिध्द होणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.०१ यांनी त्यांच्या दोनही शेतजमिनीचा एकत्रित मोजमाप करुन वादी यांना त्याचे क्षेत्र व त्याच्या हद्दी कायम करुन दिलेल्या नाही. तसेच गट क्र.३८१ ची मोजणी करण्याकरीता प्रतिवादी क्र.०१ यांची संमती असणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस आहे असे दिसून येते.

१३ वादीने सन १९८२ पासून त्यांनी खरेदी केलेल्या शेजमिनीची मशागत केलेली असून त्यावर बराच खर्च केलेला आहे. सन १९८२ चे दावा मिळकतीचे कब्जेवहीवाटीत आहेत व त्यावर त्यांनी घर देखील बांधले आहे. सदर कथनांच्या समर्थनार्थ त्यांनी इलेक्ट्रीसिटी बिल, दावा मिळकतीचे छायाचित्र, तसेच सागर निवृत्ती भोर व महादु शंकर झनकर यांचे शपथपत्र देखील दाखल केलेले आहे. त्यामुळे वादातील शेतजमिनीवर सन १९८२ पासून वादीचा कब्जा आहे असे दिसून येते. त्यामुळे वादीने त्याच्या वादपत्रात केलेली कथनात तथ्य असून सकृतदर्शनी केस ही वादीच्या हक्कात असल्याचे दिसून येते. वादी, प्रतिवादीची शेतजमीन गट क्र.३८२ वर अतिक्रमण आढळून आल्यास ते कायदेशिरपणे काढून देणे गरजेचे आहे व त्याकरीता गट क्र.३८१ व ३८२ ची एकत्रित मोजणी करणे गरजेचे आहे. परंतु, त्यापुर्वी दोनही गटांची मोजणी होण्यापुर्वीच प्रतिवादी क्र.०१ यांनी महसूल अधिका-यांच्या निकालाप्रमाणे व दिनांक १८/०१/२०१७ रोजीच्या मोजणी नकाशाप्रमाणे वादीचे गट क्र.३८२ वरील तथाकथित ०.३३ हे.आर. क्षेत्राचे अतिक्रमण काढून घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम पारीत न झाल्यास वादीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. प्रतिवादीच्या गट क्र.३८२ मध्ये वादीचे अतिक्रमण आढळून आल्यास ते कायदेशिररित्या काढता येईल तसेच त्याकरीता प्रतिवादी क्र.०१ यांना वादीकडून नुकसान भरपाई देखील घेता येईल अशा परिस्थितीत सोईचे पारडे हे वादीच्या हक्कात आहे त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ ते ०३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

मुद्दा क्र.०४ करीता :-

१४ वरील सर्व विवेचनावरुन सकृतदर्शनी केस ही वादीच्या हक्कात आहे. वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम पारीत न केल्यास वादीचे अतोनात नुकसान होईल. तसेच सोईचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे. अशा परिस्थितीत वादीचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

०१)	वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.
०२)	दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ यांनी स्वत: किंवा इतरांमार्फत वादीच्या ताब्यात असलेल्या दावा मिळकत गट क्र.३८१ क्षेत्र २ हे. वरील कब्जास कोणताही हिल्ला हरकत व अडथळा करु नये व त्यातून कोणताही रस्ता काढू नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.
०३)	वादी यांनी वादातील मिळकत गट क्र.३८१ व गट क्र.३८२ च्या एकत्र मोजणीकरीता लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी. प्रतिवादी क्र.०२ व ०६ यांनी वादीला एकत्रित मोजणीकरीता संमती देउन योग्य ती मदत करावी.

MANJUSHA MANIKRAO ALONE
Digitally signed by MANJUSHA MANIKRAO ALONE
Date: 2023.03.09 15:03:59 +0530

ठिकाण - इगतपुरी
दिनांक - २८/०२/२०२३

(एम.एम.अलोणे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
इगतपुरी